**प्रेस नोट दि.१२/०२/२०२४**

**शहर गुन्हे शाखेकडुन मोटार सायकल चोरीचे ०५ गुन्हे उघडकीस.**

---

सोलापूर शहरातील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी, शहर गुन्हे शाखेचे स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथक हे सोलापूर शहर परिसरात, मोटार सायकल चोरीचे गुन्हेगारांचा शोध घेत असताना, दिनांक ०७/०२/२०२४ रोजी त्यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "कौंतम चौकातील, टु-व्हिलर मेकॅनिक, बालाजी मलजी हा चोरीची मोटार सायकल विक्री करीता घेवुन, अक्कलकोट रोडवरील लक्ष्मी मंदिर जवळील मोकळ्या मैदानात थांबला आहे".

अशी बातमी मिळाल्याने, बातमीच्या ठिकाणी जावुन, स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथकाने, इसम नामे बालाजी नागनाथसा मलजी, वय-४९ वर्षे, व्यवसाय-मेकॅनिक, रा. घर नं-३७४, भारतरत्न इंदिरा नगर, राठी कारखान्या समोर, सोलापूर यास सापळा लावुन ताब्यात घेतले.

त्यानंतर, बालाजी नागनाथसा मलजी यांचेकडे, स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथकाने, कौशल्यपुर्वक तपास केला असता, नमुद आरोपीने सोलापूर शहरातील ०३ तसेच सांगली येथील ०१ व पुणे येथील ०१ अशा एकुण-०५ मोटार सायकली चोरी केल्याची कबुली दिली. तसेच त्यानंतर, त्या चोरी केलेल्या ०५ मोटार सायकली काढून दिल्या. त्यानुसार, खालीलप्रमाणे ०५ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं / कलम | मो. सायकल क्रमांक | किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | फौजदार चावडी | गुरनं-०६/२०२४ भादंवि-३७९ | MH-१३ CV-९४०७ | रू.५०,०००/- |
| २ | विजापूर नाका | गुरनं-५०/२०२४ भादंवि-३७९ | MH-१३ BC-०९३९ | रू.५०,०००/- |
| ३ | जोडभावी पेठ | गुरनं-६०/२०२४ भादंवि-३७९ | MH-१३ DD-३१४६ | रू.३०,०००/- |
| ४ | उमदी पो.स्टे. सांगली | गुरनं-२५६/२०२१ भादंवि-३७९ | MH-१० CP-७५७४ | रू.५०,०००/- |
| ५ | हिंजवडी पो.स्टे. पुणे | गुरनं-२५/२०२१ भादंवि-३७९ | MH-०९ CT-८४३३ | रू.५०,०००/- |
| | | | **एकूण** | **रू.२,३०,०००/-** |

सदरची कामगीरी, मा. श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, मा. डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, मा. श्रीमती प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. संदिप पाटील, व पोलीस अंमलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, अविनाश पाटील, मच्छिंद्र राठोड, प्रकाश गायकवाड यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता**

Scanned with OKEN Scanner

